# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०८/२०२६ ( शुक्रवार )**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील ०७ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना भारताच्या मा. राष्ट्रपती यांचेकडुन गुणवत्तापुर्ण सेवेचे तसेच गृह मंत्रालय, भारत सरकार यांचेकडुन ''अतिउत्कृष्ट/उत्कृष्ट'' सेवा पदके प्रदान

भारताच्या स्वातंत्र्यदिनी दिनांक १५/०८/२०२६ रोजी जाहीर करण्यात येणारे मा. राष्ट्रपती यांचेकडुन गुणवत्तापुर्ण सेवेचे पदक तसेच गृहमंत्रालय भारत सरकार यांचेकडुन दीर्घकालीन व निष्कलंक सेवेबाबत **''अतिउत्कृष्ट सेवा पदक''** **आणि ''उत्कृष्ट सेवा पदक''** जाहीर झाले असुन त्यामध्ये नागपूर ग्रामीण पोलीस दलातील खालील अधिकारी व अंमलदार यांचे समावेश आहे.

१) श्री. वैभवकुमार जगदेवराव जाधव, पोलीस निरीक्षक नागपूर ग्रामीण (सध्या— सहायक पोलीस आयुक्त, नागपूर शहर)—मा. **राष्ट्रपती यांचे गुणवत्तापुर्ण सेवेचे पदक**

२) श्री. प्रमोद माणिकराव घोंगे, पोलीस निरीक्षक, नेमणूक जिल्हा विशेष शाखा, नागपूर ग्रामीण — **गृह मंत्रालय भारत सरकार यांचे उत्कृष्ट सेवा पदक**

३) श्री. चंद्रकांत राजमल काळे पोलीस निरीक्षक, नेमणूक पोलीस स्टेशन खापा, नागपूर ग्रामीण — **गृह मंत्रालय भारत सरकार यांचे अतिउत्कृष्ट सेवा पदक**

४) श्री. नरेंद्र भिमराव गौरखेडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, नेमणूक वाहतूक शाखा, नागपूर ग्रामीण— **गृह मंत्रालय भारत सरकार यांचे अतिउत्कृष्ट सेवा पदक**

५) श्री. बद्रूलाल रामलोटन पांडे, पोलीस उपनिरीक्षक, नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण— गृह मंत्रालय भारत सरकार **यांचे अतिउत्कृष्ट सेवा पदक**

६) श्री. रत्नाकर वामनराव ठाकरे पोलीस हवालदार नेमणूक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, काटोल, नागपूर ग्रामीण **—गृह मंत्रालय भारत सरकार यांचे उत्कृष्ट सेवा पदक**

७) श्री. अजय मुरलीधर तिवारी पोलीस हवालदार, नेमणूक सायबर सेल, नागपूर ग्रामीण—**गृह मंत्रालय भारत सरकार यांचे उत्कृष्ट सेवा पदक**



**पोनि श्री. वैभवकुमार जाधव**
**सध्या सहा. पोलीस आयुक्त**
**नागपूर शहर**



**पोनि. श्री. प्रमोद माणिकराव घोंगे**



**पोनि.श्री. चंद्रकांत रा. काळे**



**सपोनि.श्री. नरेंद्र भि. गौरखेडे**



**पोउपनि.बद्रुलाल रा. पांडे**



**पोहवा रत्नाकर वामनराव ठाकरे**



**पोहवा अजय मु. तिवारी**

## नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांकडुन पोलीस पाटील यांच्यासाठी करण्यात आले AI टूल्स कार्यशाळेचे आयोजन

**मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनाखाली** पोलीस पाटील यांना आधुनिक 'कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI)' तंत्रज्ञानाची माहिती मिळावी तसेच त्याचा पोलीस कामकाजात प्रभावी, सुरक्षित व जबाबदारीने वापर करता यावा, या उद्देशाने नागपूर ग्रामीण जिल्हयातील उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे उपविभागांतर्गत आज दि. १४/०८/२०२६ रोजी AI टूल्स कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या दरम्यान नागपूर ग्रामीण जिल्हयातील अंदाजे २०० पोलीस पाटील यांना AI टूल्स प्रात्यक्षिकाव्दारे प्रशिक्षण देण्यात आले.

या कार्यशाळेस उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग श्री. संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग श्री. पराग पोटे, उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग श्री. रमेश बरकते, सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग श्री मयंक माधव, अति. कार्यभार उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, श्री सागर खर्डे यांनी तसेच पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस अधिकारी यांनी आपापले उपविभागात कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेदरम्यान वेगवेगळया आधुनिक AI टुल्सचा यांसारख्या पोलीस कामकाजात प्रभावी व जबाबदारीने वापर कसा करता येईल, याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले. माहितीचे संकलन व विश्लेषण, दैनंदिन कामकाज सुलभ करणे, आवश्यक माहितीचे आकलन करणे तसेच वेळेची बचत करून कामकाज अधिक कार्यक्षम करण्यासाठी AI तंत्रज्ञानाचा संभाव्य उपयोग, आधुनिक तंत्रज्ञानाचा पोलीस कामकाजात प्रभावी वापर करण्यासोबतच गावपातळीवर 'कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, सायबर गुन्हे, चोरीच्या घटना व इतर

गुन्ह्यांना प्रतिबंध करणे' यासाठी पोलीस पाटील आणि पोलीस यंत्रणा यांच्यातील समन्वय अधिक बळकट करण्यावर यावेळी विशेष भर देण्यात आला.

सदर कार्यशाळेस उपविभागातील पोलीस पाटील' मोठ्या संख्येने उपस्थित होते. आधुनिक AI तंत्रज्ञानाचा योग्य व जबाबदारीने वापर करून पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी अशा प्रकारच्या प्रशिक्षण व मार्गदर्शनपर उपक्रमांचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले.




पोलीस स्टेशन नरखेड
AI टूल
कार्यशाळा


पोलीस स्टेशन सावनेर
AI टूल
कार्यशाळा




## नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग यांची बनावट देशी आणि विदेशी दारू निर्मिती कारखान्याविरुद्ध धडक कारवाई

**काटोल :—** मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा तसेच श्री. वैभव वैद्य, मा. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर–2 आणि श्री. मंगेश कावळे, प्रभारी उप अधीक्षक, नागपूर–2 यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन काटोल तसेच राज्य उत्पादन शुल्क काटोल, उमरेड, सावनेर व रामटेक विभागाने संयुक्त कारवाई करत पोस्टे काटोल हद्दीत आनंदगड माळाच्या पायथ्याशी, मौ. चिखलागड, ता. काटोल, जि. नागपूर या ठिकाणी एका शेतातील घरामध्ये, बनावट देशी/विदेशी दारू तयार करण्यात येत असल्याबाबत मिळालेल्या गुप्त बातमीवरून संयुक्तरित्या धाड टाकली असता सदर ठिकाणी देशी दारू रॉकेट संत्रा ब्रँडच्या 90 मिली क्षमतेच्या 204 बॉक्स, देशी दारू टँगो पंच ब्रँडच्या 90 मिली क्षमतेच्या 156 बॉक्स, रॉयल स्टॅग या विदेशी मद्याच्या 180 मिली क्षमतेच्या काचेच्या 408 बाटल्या असे एकूण 368 बॉक्स बनावट देशी व विदेशी मद्य तसेच रॉयल स्टॅग व व्हिस्की बनविण्याकरिताचा तयार ब्लेंड (तयार दारू) 1500 ब.लि., देशी दारू बनविण्यात येणारे रेक्टिफाइड

स्पिरिट 1000 ब.लि. तसेच सदरचे मद्य बनविण्याकरिता लागणारे इतर साहित्य तसेच सदर माल वाहतूक करण्याकरिता वापरात येणारी एक महिंद्रा कंपनीची पांढऱ्या रंगाची बोलेरो पिकअप गाडी क्रमांक MH04/JU8722 व एक ह्युंदाई कंपनीची पांढऱ्या रंगाची आय– 20 कार क्रमांक MH34BR1573 असे दोन वाहने मिळून दारूबंदी कायद्याअंतर्गत एकूण 54,81,070/- रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने सदर मुद्देमाल जप्त करून सदर अवैध व बनावट दारू चा कारखाना चालविणारे आरोपी नामे १) लोकेश राजेश भैसारे, वय 37 वर्षे, रा. प्लॉट क्र. 98, कपिल नगर, नारीरोड, उप्पलवाडी, जि. नागपूर २) यश सुरेश शेंडे, वय 25 वर्षे, रा. सायखेडा, ता. केळापूर, जि. यवतमाळ ३) देवेन रामचंद्र जाधव, वय 26 वर्षे, रा. बलवाडी, ता. वरला, जि. बडवानी (म.प्र.), ४) दीपक गुलाब पावरा, वय 30 वर्षे, रा. दूधखेडा, ता. वरला, जि. बडवानी (म.प्र.) यांचे विरूध्द राज्य उत्पादन शुल्क विभागाने महाराष्ट्र दारूबंदी कायदा, 1949 नुसार गुन्हा नोंद केलेला आहे.

सदर कारवाईमध्ये १) श्री. आनंद भा. पवार, निरीक्षक, राउशु, काटोल विभाग, नागपूर २) श्री. मंगेश कावळे, निरीक्षक, राउशु, उमरेड विभाग श्री. दत्तात्रेय लाडके, निरीक्षक, राउशु, सावनेर विभाग, श्री. जयेंद्र जिकार, निरीक्षक, राउशु, रामटेक विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागाचा स्टॉफ तसेच पोलीस स्टेशन काटोल नागपूर (ग्रामीण) येथील पोलीस निरीक्षक श्री. रणजीत शिरसाट, सपोनि श्री. विवेक राऊत आणि पोलीस स्टॉफ असे हजर होते व संपूर्ण कारवाई नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस तसेच राज्य उत्पादन शुल्क विभाग यांनी संयुक्तपणे यशस्वीरित्या पूर्ण केली.







# पोलीस ठाणे कोंढाळी हद्दीतील मौजा सोनमोह पारधी बेडा अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपींवर ०३ गुन्हे नोंद, ९५ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी :—** दिनांक १३/०८/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास गोपनीय माहिती मिळाली की, कोंढाळी पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा सोनमोह पारधी बेडा येथे महिला आरोपी या त्यांचे घराचे बाहेर खुल्या जागेत मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू गाळत आहे. अशा गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर बातमीवरून मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने कारवाई करत मौजा सोनमोह पारधी बेडा घटनास्थळावरील रनिंग हातभट्टया नष्ट केल्या.

**०३ महीला आरोपी यांचेवर कारवाई करत घटनास्थळावरून तिन्ही कारवाईत पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण ४१०० लिटर मोहाफुल सडवा, ७० लिटर मोहाफुल गावठी दारू आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण ९५,२००/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०३ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**

# सायबर तंत्रज्ञानाच्या मदतीने हरवलले १४ मोबाईल फोन शोधून मूळ मालकांना केले परत मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा**:— मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग श्री. संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन मौदा येथील पथकाने सायबर तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांचे हरवलेले १४ अँड्रॉईड मोबाईल फोन शोधून काढले आहेत. सदर मोबाईल किंमती २,२०,०००/—रूपयाचा मुद्देमाल हा दिनांक १३/०८/२०२६ रोजी मौदा पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक श्री. सारीन दुर्गे यांच्या हस्ते हे सर्व मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले. मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी आनंद व्यक्त करून पोलीस प्रशासनाचे आभार मानले.




## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी :–** दिनांक १३/०८/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पोस्टे कोंढाळी हद्दीतून अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पथकाने मौजा दुधाळा जामनदी पुलाजवळ नाकाबंदी केली असता संशयित स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्रमांक एम एच–४०/डी ई–१४२४ व विनाक्रमांकाची ट्रॉली मिळुन आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्पर चालक नामे मुकेश तेजराम जुगनाके, वय ३५ वर्ष, रा. जोगा काजळी, ता. कारंजा, जि. वर्धा व महिला आरोपी (ट्रॅक्टर मालक) हे मिळुन आले. मालकाबाबत विचारपुस केली असता मालक नामे लियाकत सभान शेख, रा. कोढांळी, जि. नागपूर अशी माहिती प्राप्त झाली. वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता वाहनात ०१ ब्रास रेती मिळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष १) स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्रमांक एम एच–४०/डी इ–१४२४ व ट्रॉली किंमती ७,००,०००/–रूपये २) ०१ ब्रास रेती किंमती ७,०००/– रूपये असा एकुण ७०७०००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

नमुद आरोपी १) मुकेश तेजराम जुगनाके, वय ३५ वर्ष, रा. जोगा काजळी, ता. कारंजा, जि. वर्धा २) महिला आरोपी ३) लियाकत सुभान शेख, वय ४७ वर्ष, रा. कोढांळी यांचेविरूध्द पोस्टे कोंढाळी येथे कलम ३०३ (२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) म.ज म सहीता सहकलम ४, २१ खान खनिज अधिनियम, सहकलम १९२ अ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पोस्टे कन्हान हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान :—** दिनांक १३/०८/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, पोस्टे कन्हान हद्दीत अभिषेक यशवंत रोडगे हा काही लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे.मिळालेल्या माहीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी पोहचले असता मच्छी मार्केट येथील जयस्वाल दारू भट्टीच्या बाजूला आरोपी नामे अभिषेक यशवंत रोडगे, वय ३४ वर्ष, रा. नया नगर राणी तलाव कामठी, ता. कामठी जि. नागपूर हा कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आला. पोलीसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम ३०१०/— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहित्य असा एकुण ३०१०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपी अभिषेक यशवंत रोडगे, वय ३४ वर्ष, रा. नया नगर राणी तलाव कामठी, ता. कामठी जि. नागपूर यांच्या विरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# कळमेश्वर येथे ''अंमली पदार्थ मुक्त महाराष्ट्र'' या अभियानांतर्गत जनजागृती कार्यक्रम व रॅलीचे आयोजन

मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि १४/०८/२०२६ रोजी मौजा कळमेश्वर येथील नगरपरिषद हायस्कूल येथे ''अंमली पदार्थ मुक्त महाराष्ट्र'' या अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

सदर कार्यक्रमात पोलीस निरीक्षक श्री. गणेश फुलकवर, प्रभारी अधिकारी, भरोसा सेल यांनी शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षकांना अंमली पदार्थांचे दुष्परिणाम सांगून त्यांचा वापर न करण्याची सामूहिक शपथ देण्यात आली. तसेच विद्यार्थी, शिक्षक व पोलीस कर्मचाऱ्यांच्या समवेत गावातील मुख्य मार्गावरून जनजागृती रॅली काढण्यात आली.

सदर कार्यक्रमास हायस्कूलचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच भरोसा सेल व पोलीस अधीक्षक कार्यालय येथील भरोसा सेलचे अधिकारी व अंमलदार, पोलीस स्टेशन कळमेश्वर चे अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.



# मौदा पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सराईत गुन्हेगारास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन मौदा हदद्दीतील अवैध दारू व्यवसायात सक्रिय सराईत आरोपी दशरथ किसन कुंभले, वय ३९ वर्ष, रा. मौजा भुगाव, ता. कामठी यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांनी हद्दपार केले.**

**सराईत गुन्हेगार नामे दशरथ किसन कुंभले, वय ३९ वर्ष, रा. मौजा भुगाव, ता. कामठी याचेवर अवैध दारू विक्रीचे अनेक गुन्हे नोंद आहे.** नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यानी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद अवैध दारू व्यवसायात सक्रिय गुन्हेगारांचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव मौदा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी यास **१ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी दशरथ किसन कुंभले, वय ३९ वर्ष, रा. मौजा भुगाव, ता. कामठी हा नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**दशरथ किसन कुंभले**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०५ गुन्हे नोंद. एकुण ६६,३३५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक १३/०८/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते तसेच सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ६६,३३५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे दत्ता विठ्ठलरावजी धवड, वय ४० वर्ष, रा. शारदा चौक काटोल हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे ०६ आरोपी हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे सुरेश रविंद्र निहीटे, वय ३१ वर्ष, रा. धनगर मोहल्ला जोगीठाना पेठ, उमरेड नागपूर ह. मु. वार्ड क्र. २, टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपूर हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे अभिषेक यशंवत रोडगे, वय ३४ वर्ष, रा. नया नगर राणी तलाव कामठी, त. कमाठी, जि. नागपूर हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन सावनेर येथे ०५ आरोपी हे** ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १८ गुन्हे नोंद

दिनांक १३/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, ईतर साहित्य असा एकुण १२५२८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा येथे** आरोपी नामे विनायक श्रीराम नेवारे, शिवाजी नगर घरकुल कॉलनी खापा याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे बेलचंद उर्फ राजकुमार धनलाल कटरे, वय ३५ वर्ष, रा. गंगापुर झोपडपटटी टाकळघाट, ता. हिंगना, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे १) प्रकाश पांडुरंग वगारे, वय ३१ वर्ष, रा. भिवी झमकोली ह.मु खुर्सापार, ता. भिवापुर, जि. नागपुर २) केतन अशोक केळझरे, वय ३२ वर्षे, रा. न्यु कैलास नगर मानेवाडा रोड, नागपुर ३) इंद्रकुमार चन्द्राकार, वय ३३ वर्षे, रा. बोरीदार मुनगासेर राज्य छत्तीसगड ह. मु. खालसा पंजाबी ढाबा चिमनाझरी, ता. जि. नागपुर ४) देवेंद्र देवरावजी पिंपळकर, वय ४० वर्षे, रा. टेंभरी, ता. जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी १

गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन बोरी** येथे १) आरोपी नामे दिवाकर अंकुश गवते, वय ३० वर्ष, रा. बोरखेडी रेल्वे ह. मु. धवलपेठ ता. जि. नागपुर २) कुमोद शत्रुघ्न पारधी, वय २९ वर्ष, रा. चुल्हाड, ता. तुमसर, जि भंडारा ह. मु. शिवकुमार मोरे यांचे घरी किरायाने रूईखैरी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी येथे** ०३ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन जलालखेडा येथे** आरोपी नामे अनिल श्रावण भलावी, वय ३० वर्ष, रा. रोहना, ता. नरखेड, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी ऋषी वासुदेव देशमुख, वय ४७ वर्ष, रा. मारोडी, ता. मौदा याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी चंद्रकांत उर्फ चंदु गुलाबराव कुंभलकर, वय ४४ वर्ष, रा. गोंडेगाव कन्हान याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी कोमल सुभाष चव्हान, वय ३७ वर्ष, रा. दाहोदा, ता. रामटेक, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने